# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मि

**दिनांक: 31.07.2021** **वार: शनिवार**

---

**आधी एक विनंती....**

**18 वर्षांवरील सर्वांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरु झाली आहे. लसीकरण करून घ्या. नंतरही काळजी घ्या. मुखपट्टी वापरा, सुरक्षित अंतर राखा, हात, चेहरा वारंवार स्वच्छ धुवा. कोविड प्रतिबंधासाठीचे नवे निर्बंध पाळा. विनाकारण घराबाहेर पडून गावात गर्दी करु नका. कोविड-19 बद्दल काही प्रश्न असतील तर 011-23 978 046 आणि 1075 या राष्ट्रीय; तसंच 020-26 127 394 या महाराष्ट्रासाठीच्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधा.**

---

1. देशातल्या दोन लाख 27 हजारांहून अधिक गर्भवतींना कोरोना प्रतिबंधक लसीची पहिली मात्रा देण्यात आली
2. लसीकरण मोहिमेला वेग आणण्यासाठी भारतीय उद्योग परिषद आणि सीरम संस्थेदरम्यान करार
3. दक्षिण काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील तारसर वन क्षेत्रातील चकमकीत दोन दहशतवादी ठार
4. भारतातल्या 15 प्राचीन मूर्ती आणि वस्तू ऑस्ट्रेलियाकडून परत मिळणार आणि
5. टोकियो ऑलिंपिक्समध्ये तिरंदाजीतअतनु दासचं आव्हान संपुष्टात

---

**गर्भवती लस**

कोरोना लसीकरण मोहिमे अंतर्गत गेल्या महिनाभरात देशातल्या दोन लाख 27 हजारांहून अधिक गर्भवतींना कोरोना प्रतिबंधक लशीची पहिली मात्रा देण्यात आल्याचं आरोग्य मंत्रालयानं सांगितलं आहे. आरोग्य कर्मचारी आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गर्भवती महिलांचं नियमितपणे समुपदेशन करत त्यांना लसीकरणाचे फायदे समजावून सांगितल्यानं हे यश मिळाल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. गर्भवती महिलांच्या लसीकरणात तमिळनाडू आघाडीवर असून इथं 78 हजार 838 जणींना लस देण्यात आली आहे. त्यानंतर आंध्र प्रदेशात 34 हजार, तर ओडिशामध्ये 29 हजार 821 गर्भवती महिलांना लस मिळाली आहे.

**विमान वाहतूक**

आंतरराष्ट्रीय व्यावसायिक विमान वाहतूकीवर असलेली स्थगिती 31 ऑगस्टपर्यंत वाढवण्याचा निर्णय विमान वाहतूक महासंचालकांनी घेतला आहे. त्याबाबतचं पत्रक काल जारी करण्यात आलं. आंतरराष्ट्रीय मालवाहतुक आणि विशेष परवानगी असलेल्या विमान उड्डाणांवर मात्र बंधन नसेल, असं या पत्रकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**देश लसीकरण**

देशात कोरोना प्रतिबंधक लशीच्या आतापर्यंत 46 कोटींहून अधिक मात्रा देण्यात आल्या आहेत. काल दिवसभरात 44 लाख 38 हजारांहून अधिक जणांना लस देण्यात आली.

**सीरम करार**

लसीकरण मोहिमेला वेग आणण्यासाठी भारतीय उद्योग परिषदेनं, म्हणजेच 'सीआयआय'नं सीरम इंस्टीट्युट ऑफ इंडिया या कंपनीबरोबर करार केला आहे. यानुसार आता देशातल्या छोट्या गावांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये लसीकरणाची व्याप्ती वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. रुग्णालये आणि उद्योगजगत यांच्यातला दुवा बनत 'सीआयआय' आणि

सीरम या संस्था लसीकरण मोहिमेला वेग आणण्याचा प्रयत्न करणार आहेत. या मोहिमेमुळं दुर्गम भागातल्या लोकांपर्यंत कमी कालावधीत पोहोचता येईल, असं सीरम कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी म्हटलं आहे.

**पत्रकार मदत**

कोरोना कालावधीत पत्रकारांच्या अथक आणि अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना अभिवादन करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनं त्यांना प्रोत्साहन आणि मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार, कोरोना संकटाच्या दुसऱ्या लाटेत राज्यातल्या ज्या पत्रकारांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आर्थिक मदत करणार आहेत. आज लखनौ इथं एका कार्यक्रमात अशा कुटुंबांना दहा लाख रुपयांच्या आर्थिक मदतीचे धनादेश वितरीत केले जाणार आहेत. कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेत उत्तर प्रदेशातल्या अनेक पत्रकारांना संसर्ग झाला, तर काहींचा त्यात मृत्यूही झाला. आजच्या कार्यक्रमात एकूण 36 पत्रकारांच्या कुटुंबांना मदत केली जाणार आहे.

**जम्मू काश्मीर दहशतवादी**

दक्षिण काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील तारसर वन क्षेत्रातील नागबेरन गावात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये आज सकाळपासून चकमक सुरू आहे. या चकमकीत 2 दहशतवादी ठार झाले. सुरक्षा दलाची शोध मोहीम जारी आहे. अधिक तपशिलाची प्रतीक्षा आहे.

**मोदी आयपीएस प्रशिक्षणार्थी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी इथं आयपीएस प्रशिक्षणार्थीसोबत संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय हेदेखील उपस्थित असतील. हैदराबादची सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी ही देशातली प्रमुख पोलीस प्रशिक्षण संस्था आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधून भारतीय पोलीस सेवेसाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांना इथे प्रशिक्षण दिलं जातं.

**चीन बोलणी**

भारत आणि चीन दरम्यान कमांडर स्तरावरील चर्चेची 12 वी फेरी आज होणार आहे. पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या चीनच्या बाजूला मोल्दो सीमा बिंदूवर सकाळी साडेदहा वाजता ही चर्चा सुरु होईल, असं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. या चर्चेत भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व लेहस्थित 14 कोरचे कमांडर लेफ्टनंट जनरल पीजीके मेनन करणार आहेत. उच्चस्तरीय लष्करी चर्चेची 11 वी फेरी 9 एप्रिल रोजी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या भारतीय बाजूच्या चुशूल सीमा बिंदूवर झाली होती.

**तालिबान**

अफगाणिस्तानच्या तखार प्रांतीय केंद्राबाहेर, अफगाणिस्तान राष्ट्रीय संरक्षण आणि सुरक्षा दलांनी गुरुवारी केलेल्या कारवाईत किमान 13 तालिबान दहशतवादी ठार झाले तर 16 जण जखमी झाले. यात तालिबान्यांची काही शस्त्रं, दारुगोळा आणि उपकरणं नष्ट झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं काल सांगितलं. इतर देशांच्या सैन्य माघारीच्या पार्श्वभूमीवर तालिबाननं आपली आक्रमकता वाढवल्यामुळे अफगाणिस्तानमध्ये हिंसाचार वाढला आहे.

**जी 20 बैठक**

जी- 20 देशांच्या सांस्कृतिक मंत्री पातळीवरच्या बैठकीत परराष्ट्र व्यवहार आणि सांस्कृतिक राज्यमंत्री मीनाक्षी लेखी या काल सहभागी झाल्या होत्या. इटलीनं ही परिषद आयोजित केली होती. 'संस्कृती आणि सृजनशील क्षेत्रांचा विकासासाठी वापर' या मुद्द्यावर त्यांनी भारताची भूमिका मांडली. आर्थिक विकासामध्ये आणि रोजगारनिर्मितीमध्ये सांस्कृतिक क्षेत्राचा मोठा वाटा असून महिला आणि युवकांसह स्थानिक नागरिकांना नवीन संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता या क्षेत्रात असल्याचं मीनाक्षी लेखी यांनी यावेळी सांगितलं. या बैठकीच्या शेवटी जी 20 देशांच्या मंत्र्यांनी सांस्कृतिक कार्यकारी गटाच्या संदर्भ नियमावली स्वीकृत केली.

**प्राचीन मूर्ती**

भारताचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ठेवा असलेल्या 15 प्राचीन मूर्ती आणि वस्तू ऑस्ट्रेलियातल्या नॅशनल गॅलरीकडून परत मिळणार असल्याचं केंद्रीय सांस्कृतिक मंत्री जी. किशन रेड्डी यांनी काल सांगितलं. सांस्कृतिक मंत्रालय आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या प्रयत्नांमुळं हे शक्य झाल्याचं रेड्डी यांनी त्यांच्या ट्विटर संदेशात सांगितलं. भारताला परत मिळणाऱ्या या वस्तूंमध्ये शिव-पार्वतीची मूर्ती, पिंपळाच्या पानावरील बाळकृष्ण यांच्यासह तमिळनाडूमधल्या शिल्पकलेचा नमुना असलेल्या तीन वस्तूंचा समावेश आहे. भारताचं हरवलेलं प्राचीन वैभव परत मिळवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं रेड्डी यांनी सांगितलं.

**शेकाप निधन-सोलापुर**

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि सांगोल्याचे माजी आमदार, गणपतराव देशमुख यांचं काल रात्री सोलापुरातील एका खासगी रूग्णालयात निधन झालं. ते 94 वर्षाचे होते. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघातून 11 वेळा ते विधानसभेवर निवडून आले होते. अत्यंत साधी राहणी असलेल्या गणपतरावांनी 54 वर्षं सांगोल्याचं प्रतिनिधित्व केलं होते. आदर्श लोकप्रतिनिधी असलेल्या देशमुख यांनी शेतकरी, कष्टकरी आणि जन-सामान्यां प्रती आपली बांधिलकी शेवटपर्यंत जपली, अशा शब्दांत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गणपतराव देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**ऑलिम्पिक्स**

टोकियो ऑलिम्पिक्समध्ये आज थाळीफेकीत कमलप्रीत कौर हिनं भारताच्या आशा कायम ठेवल्या आहेत. 64 मीटर थाळीफेक करत ती अंतिम फेरीसाठी पात्र ठरली आहे. सीमा पुनिया तिच्या गटात सहाव्या क्रमांकावर आली. तिनं 60 पूर्णांक 57 मीटर अंतरापर्यंत थाळीफेक केली. मात्र या गटात कोणत्याही स्पर्धकाला पात्रतेसाठी आवश्यक असलेला 64 मीटरचा टप्पा ओलांडता न आल्यानं अंतिम 12 मध्ये स्थान मिळवण्याच्या सीमाच्या आशा कायम आहेत.

दिवसाच्या सुरुवातीला मात्र भारताला धक्के बसले. तिरंदाजीमध्ये अतानु दास याला आज सकाळी जपानच्या ताकाहारू फारूकावा याच्याकडून पराभव स्वीकारावा लागला. मुष्टियुद्धातही उप उपांत्य पूर्व सामन्यात कोलंबियाच्या युबरजेन मार्टिनेझ यानं भारताच्या अमित पंघल याचा 4-1 असा पराभव केला.

आज नेमबाजीमध्ये, तेजस्विनी सावंत आणि अंजुम मौदगिल; महिलांच्या 50 मीटर रायफल थ्री पोझिशन्सची पात्रता फेरी खेळणार आहेत. आत्ताच आलेल्या वृत्तनुसार भारतीय महिला हॉकी संघाचाही दक्षिण आफ्रिका संघाबरोबर सामना सुरु असून महिला हॉकी संघानं 2-1 अशी आघाडी घेतली आहे. बॅडमिंटनच्या महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत पी. व्ही. सिंधू हिचा आज जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या चीनी तैपेईच्या ताई झु इंग हिच्याबरोबर सामना होणार आहे.

**हवामान**

राजधानी दिल्लीत तसंच लेह, गिलगीट आणि आगरताळा इथं आज ढगाळ हवामानात हलक्या पावसाची शक्यता आहे. मुंबईत तसंच गुवाहाटी, इंफाळ आणि कोहिमा इथं मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. चेन्नईमध्ये आकाश ढगाळ राहील. जम्मू, श्रीनगर, मुजफराबाद, शिलॉन्ग, ऐजवाल, इटानगर, गंगटोक आणि कोलकातामध्ये मेघ गर्जनेसह पावसाच्या सरी पडण्याची शक्यता हवमान विभागानं वर्तवली आहे.

---

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.